म्हाडा MHADA

# उपमुख्य अधिकारी / पणन विभाग,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

कक्ष क्र.२४०, पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई-५१


==========================================================

जा.क्र.उमुअ(पणन)/मुं.मं./ १३९ /२०
दिनांक : ०८/०१/२०२१

## <u>परिपत्रक</u>

**विषय : लॉकडाऊन कालावधीमधील सोडतीतील यशस्वी व पात्र अर्जदारांना सदनिकेची विक्री किंमतीचा भरणा करणेकरीता मुदतवाढी देणेबाबत**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयाची विक्री, हस्तांतरण व अदला बदल) विनियम १९८१ च्या तरतूदीस अनुसरुन म्हाडाच्या विभागीय मंडळाच्या सदनिका सोडत पध्दतीने वितरण करण्यात येतात. सोडतीत यशस्वी होणा-या लाभार्थ्याकडून सदनिकेची निश्चित केलेली किमंत लाभार्थ्याची पात्रता निश्चित झाल्यानंतर भरणा करुन घेण्यात येते. त्याकरिता प्राधिकरणाचा ठराव क्र. ६६३७ दिनांक २४/१०/२०१३ व ठराव क्र. ४८८१ दिनांक ०१/०४/२०१७ पारित करण्यात आला आहे.

सदस्थितीत महाराष्ट्र शासनाने कोविड-१९ ही महामारी (Pandemic)म्हणून घोषित केली. त्यास अनुसरुन शासनाने विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. कोरोना पार्श्वभूमीवर लाभार्थ्यांना सदनिकाच्या रकमा भरणा करणेबाबत नियमित कार्यवाही होवू शकलेली नाही. त्यामुळे दिनांक ०१/०४/२०१७ च्या परिपत्रकातील वेळापत्रकानुसार कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. त्यामुळे मुंबई मंडळाने सर्वसाधारण सोडतीमधील / ई लिलावातील लाभार्थ्यांना कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आली.

१. मुंबई मंडळांतर्गत सोडतीमधील तसेच ई लिलावातील सर्व लाभार्थ्यांना विक्री किमंत भरणा करण्यासाठी दिनांक १५ डिसेबर २०२० पर्यंत बिनव्याजी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ त्यापुढे दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत नियमानुसार व्याज अदा करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.

२. मुंबई मंडळातील सोडतीमधील लाभार्थ्यांना तात्पुरते देकारपत्र निर्गमित केलेल्या सोडत २०१७ मधील संकेत क्र. ३४०,३४१,३४२ व ३४३ (गेस्ट हॉऊस प्लॉट, उन्नतनगर गोरेगांव) या योजनेतील सदनिका महानगरपालिकेने विलगीकरणासाठी ताब्यात घेतल्या आहे. त्यामुळे सदर सदनिकांची विक्री किमंत भरण्याकरिता दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत किंवा सदर गाळे मंडळाच्या ताब्यात येईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल त्या कालावधीपर्यंत बिनव्याजी मुदतवाढ देण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांचे मान्यतेने) सही/-

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

प्रत

१. मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीकरीता
२. सचिव / प्राधिकरण यांना माहितीकरीता
३. वित्त नियत्रंक / प्राधिकरण यांना माहितीकरीता
४. विधी सल्लागार / प्राधिकरण यांना माहितीकरीता
५. मुख्य लेखाधिकारी/मुंबई मंडळ यांना योग्य त्या कार्यवाहीकरीता
६. व्यवस्थापक / ॲक्सीस बॅक व त्यांच्या शाखा यास योग्य त्या कार्यवाहीकरीता
७. मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी / प्रा. यांना माहिती करीता व म्हाडा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.